स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

जा.क्र./विकसन/सी.सी.टि.व्ही./मोशी,मांजरी/देखभाल/दरपत्रके./२७५३/२०२५-२६ दि.१३/०२/२०२६

**प्रसिध्दीपत्रक**

**विषय** - कृषि उत्पन्न बाजार समिती पुणेचे मोशी व मांजरी उपबाजार आवार येथे सी.सी.टि.व्ही. यंत्रणेची देखभाल दुरुस्ती कामाची दरपत्रके सादर करणेबाबत....

उपरोक्त विषयस अनुसरुन अनुभवी ठेकेदार यांना सुचित करणेत येते की, कृषि उत्पन्न बाजार समिती पुणेचे उपबाजार आवार मोशी व मांजरी आवारामध्ये कार्यान्वित असलेल्या सी.सी.टि.व्ही. यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे कामकाजाचा ठेका १२ महिने कालावधीसाठी देणेकामी दरपत्रके मागवित आहोत.

सदर काम करणेसाठी खालील नियम व अटीचे अधिन राहुन आपले कमीत कमी दराचे सीलबंद दरपत्रक दि२०/०२/२०२६ अखेर दु.१.०० वाजेपावेतो संस्थेच्या मुख्य कार्यालयात सादर करावे.

**नियम व अटी**

१. या ठेक्यामध्ये दुरूस्तीसाठी लागणाऱ्या साहित्याचा (मटेरिअल) समावेश नाही. तथापी दुरूस्तीसाठी लागणाऱ्या साहित्याचा पुरवठा बाजार समितीमार्फत केला जाईल. त्यानुसार सुचनेनुसार प्रत्यक्ष कामे करावयाची आहेत.

२. सदर कामामध्ये ठेकेदार/ त्यांचे कर्मचारी यांनी महिन्यामधुन एक COMPULSARY PREVENTIVE MAINTAINCE VISIT PER CAMERA तसेच UNLIMITED BREKDOWN CALLS चा समावेश असेल. PREVENTIVE MAINTAINCE VISIT मध्ये खालील कामांचा समावेश असेल.

a) Cleaning, testing and calibration of Cameras
b) Network pinging and data transmission check
c) Recording of NVR Hard disk Check
d) Server, Camera Fiber Converter and POE Switches Connectivity
e) TV.UPS and Video Management software Check
f) Cat6 Cable and Fiber Cable Connectivity
g) Software and firmware updates of devices
h) Coordination regarding footage retrieval and data compression

बाजार समितीने तांत्रिक बिघाड झालेचे कळविलेनंतर RESPONSE TIME २४ तासाचा असेल.

३. मोशी उपबाजार आवार व मांजरी उपबाजार आवार येथील सी.सी.टि.व्ही. यंत्रणा देखभाल दुरुस्तीचे कामाची १ वर्ष कालावधीची रक्कम रु.३,३४,३९९/- एवढी निश्चित केलेली आहे. कामाचा कार्यादेश मिळालेनंतर ठेकदाराने रक्कम रु.२५,०००/- सुरक्षा अनामत रक्कम बाजार समितीकडे जमा करावी, सदरची रक्कम काम पुर्ण झालेनंतर बिनव्याजी परत करणेत येईल.

४. बाजार समितीने बसविलेली संपूर्ण बाजार आवारातील सी.सी.टी.व्ही. सुरक्षा यंत्रणेचे देखभाल दुरूस्तीचे कामकाज करणे संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील. तसेच इंटरनेट व्यवस्था सर्व ठिकाणी सुरळीत ठेवणे संबधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.

५. देखभाल दुरूस्तीचे कामाचे कॉल लॉग बुक ठेवणे बंधनकारक असेल.

६. सदर कामाचा ठेका मिळालेनंतर त्वरीत सी.सी.टी.व्ही यंत्रणेची पाहणी करून बंद / नादुरूस्त असलेले कॅमेरे, उपकरणे दुरूस्त / कार्यान्वित करून देणे ठेकेदारवर बंधनकारक असेल.अनुभवी ठेकेदारास प्राधान्य देणेत येईल.

७. देखभाल दुरूस्ती कामासंबंधी आवश्यक उपकरणे ठेकेदाराकडे उपलब्ध असणे आवश्यक असेल. तसेच फायबर ऑप्टीकल केबल जोडणे इ. कामाचे खर्चाचा ठेक्याचे रक्कमेत समावेश असेल.

८. संपुर्ण सी.सी.टी.व्ही. यंत्रणेमध्ये कोणताही तांत्रिक दोष अथवा त्रुटी आढळल्यास ठेक्याच्या कालावधीमध्ये या कार्यालयाच्या निदर्शनास आणून देणे व त्याचे योग्य निराकरण करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

९. सदर कामाच्या ठेक्यांतर्गत या कार्यालयाच्या अधिकारी / कर्मचारी यांना यंत्रणा हाताळणीचे प्रशिक्षण देणे व प्रशिक्षणावर देखरेख करणे संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.

फोन : ९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७

१०. ठेकेदाराने सदर कामाची निविदा रक्कम नमूद करताना ती सर्व शासकीय कर व आकारांसहित असेल याची नोंद घ्यावी. निविदा रक्कमेव्यतिरिक्त कराची रक्कम ठेकेदारास स्वतंत्रपणे देण्यात येणार नाही. तसेच नमूद ठेका रक्कमेमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ दिली जाणार नाही. तसेच दरपत्रके सादर करणेपुर्वी सी.सी.टि.व्ही. यंत्रणेची प्रत्यक्षात पाहणी करावी.

११. ठेक्याचे कालावधीत ठेकेदाराचे हलगर्जीपणामुळे सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बंद राहून कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

१२. ठेक्याची मुदत पुर्ण झाली असली तरी पुढील कालावधीचा ठेका दिला जाई पावेतो त्याच रक्कमेमध्ये ठेक्याचे कामकाज करण्याची जबाबदारी ठेकेदारांची असेल.

१३. ठेकेदारांचे कामकाज बाजार समितीस असमाधानकारक वाटल्यास ठेका त्वरीत रद्द करण्याचा अधिकार बाजार समितीला असेल.

१४. निविदा धारकाचे काम करणाऱ्या कामगारांना कोणताही अपघात, दुखापत, आजारीपण झाल्यास त्याची बाजार समितीवर कोणतीही जबाबदारी असणार नाही. ती सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची असेल.

१५. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा/दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बाजार समितीस असेल.

१६. वरील नियम व अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा/दरपत्रके भरावी.

सचिव

**कृषि उत्पन्न बाजार समिती पुणे**